## प्रेस नोट

## दिनांक ०३/०४/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.धनंजय जनार्दन बोंडे, वय ४५वर्ष, सचिव, जानकी सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती.(खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक २८/०३/२०१९ अं. १०:०७ वा. ते दिनांक ०२/०४/२०१९ चे ०९:२० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ६,०००/—रु. |
| ५ | तडजोडअंती मागणी केलेली रक्कम | ५,२००/— रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. |
| ६ | घटनास्थळ | आरोपीचे घर पन्नालाल बगीचा, भुतेश्वर चौक, अमरावती. |

यातील तक्रारदार हे संरक्षण अधिकारी, अभय केंद्र चांदुरबाजार जि.अमरावती येथे बहुउद्देशीय कर्मचारी (कंत्राटी) या पदावर मानधनावर काम करत आहे. सन २०१८—१९ करीता महिला बालविकास विभाग अमरावती यांचे मार्फतीने अभय केद्रां अंतर्गत तालुका स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या संरक्षण अधिका—यांना सहाय्य करण्यासाठी बहुउद्देशीय कर्मचारी व सहाय्यक या पदाची भरती करणेबाबतचे टेंडर जानकी सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अमरावती यांना मिळाले होते. या संस्थेमार्फत तक्रारदार यांची नियुक्ती ११ महिन्याकरीता मानधन तत्वावर संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, चांदुरबाजार जि.अमरावती येथे दिनांक ०७/१२/२०१८ रोजी झालेली असुन वरील प्रमाणे तक्रारदार यांची बहुउददेशीय कर्मचारी (कंत्राटी) या पदावर नेमणुक करून दिल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांना बहुउददेशीय कर्मचारी (कंत्राटी) म्हणुन मिळणारे मानधन तक्रारदार यांचे अकांउटवर जमा करणेकरीता जानकी सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती चे सचीव श्री.धनंजय बोंडे हे तक्रारदार यास प्रति महिना ३,०००/— रुपये याप्रमाणे दोन महिन्याचे तक्रारदार यांचे मानधन देण्यासाठी एकुण ६,०००/—रु. लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २८/०३/२०१९ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान जानकी सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती चे सचिव श्री.धनंजय बोंडे यांनी तक्रारदार यांना बहुउददेशीय कंत्राटी कर्मचारी म्हणुन मिळणारे दोन महिन्याचे मानधन हे तक्रारदार यांचे अकांउटवर जमा करणेकरीता ६,०००/— रु. लाचेची मागणी करुन तक्रारदार यांचे कामाचे दिवसाचा हिशोब करुन २२ दिवसांचे २,२००/— रु. व एका महिण्याचे चे ३,०००/— रु. याप्रमाणे एकुण ५,२००/— रु. लाचेची मागणी करुन तक्रारदार यांचे एटीएम घेवुन किंवा त्यांचे अकाउंटवर सदर रक्कम ट्रान्सफर करणे अशाप्रकारे लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून लाच स्विकारण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर दि.०२/०४/२०१९ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी श्री.धनंजय बोंडे यांनी तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाल्यावरून आरोपी श्री. धनंजय बोंडे यांना आज दिनांक ०३/०४/२०१९ रोजी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती व श्री.गजानन पडघन, पोलीस उप अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक रूपाली पोहनकर, पोलीस निरिक्षक रविंद्र जेधे,म.पो.हवा. ज्योती झाडे, ना.पो.कॉ. युवराज राठोड, पो.शि.पंकज बोरसे, पो.शि.शैलेश कडू व चालक सपोउपनि.सतिश किटुकले, चालक ना.पो.कॉ. अकबर हुसेन यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क्र. — ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४.

(रूपाली पोहनकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned by CamScanner